।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना ६ नोव्हेंबर १९८३
RNI NO. MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | मंगळवार दि २३ जून २०२६ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २५ वा


# सांगोला तालुक्यात पांढऱ्या दुधाचा काळा धंदा जोमात;आठवड्याला लाखोंचे उत्पन्न !!

## सांगोल्यातील काही ठराविक मोजकी उद्योगपती मालामाल






सांगोला : सांगोला तालुक्यामध्ये गेल्या काही वर्षापासून दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असून डाळिंबाच्या लागवडी कमी झाल्यानंतर अनेक शेतकरी नियमित उत्पन्नाचे स्तोत्र म्हणून दूध व्यवसायाकडून वळल्यामुळे तालुक्यातील अनेक भागातून मोठ्या प्रमाणात दूध उत्पादन होत आहे.परंतु सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असले तरी जे उत्पादन होते त्या दुधामध्ये बाहेर पाठवताना मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याची चर्चा असून पांढऱ्या दुधाचा हा काळा धंदा गेल्या काही वर्षापासून काही ठराविक तथाकथित उद्योगपती कडून बिनदिकतपणे सुरू असून लोकांच्याया जीवाशी खेळणार्या या दुध संकलन केंद्रावर अन्न सुरक्षा विभाग कार्यवाही करणार का ?असा सवाल या निमित्ताने सांगोला तालुक्यातील जनतेतून विचारला जात आहे.

सांगोला तालुक्यामध्ये अनेक खिल्लार जातीची जनावरे असून मोठ्या प्रमाणात भरत असलेला महाराष्ट्रात नावलौकिक असलेला जनावराचा बाजार यामुळे सांगोला तालुक्यात दर्जेदार व दुभत्या,चांगल्या जनावराचा ठेवा शेतकरी वर्गा कडे असल्याने त्या माध्यमातून शेतकरी दूध उत्पादन करून उत्पन्न मिळवत आहेत.यामध्ये प्रामुख्याने जर्सी व म्हैस यांचा समावेश आहे.यात तालुक्यात तब्बल साठ हजार म्हशी व एक लाख दहा हजार जर्शी आहेत.सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणात दूध संकलन होत असले तरी जे दूध संकलन होते त्यानंतर ते दूध संकलन केंद्रे परगावी म्हणजेच मुंबई पुणे यासारख्या ठिकाणी पाठवले जाते त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जवळजवळ ५० टक्के प्रमाणात भेसळ होत असल्याचेही बोलले जात आहे.

पांढऱ्या दुधाच्या काळ्याधंद्यामुळे सांगोल्यातील काही ठराविक मोजकी मंडळी मालामाल होऊन सध्या मोठ्या फॉर्म मध्ये गाजावाजा करून ग्रँड इव्हेंट करून त्यांच्या उद्योगाच्या ब्रँडचा प्रचार करीत असल्याचेही दिसत आहे.मात्र या ग्रँड इव्हेंट आणि मोठ्या उद्योगाच्या मागे पांढऱ्या दुधाचा भेसळीचा काळा धंदा असल्यानेच हे सर्व मोकाटपणे सर्वांच्या साक्षीने आणि दिमाखात जोमात सुरू आहे,गेल्या आठवड्यामध्ये यातीलच एका दूध संकलन केंद्राच्या दुधाचा टँकर पुण्याजवळ अन्नप्रशासनाने पकडला असल्याचीही चर्चा आहे.परंतु सदरील प्रकरण चव्हाट्यावर न आणता तेरे भी चूप मेरी भी चूप अशा प्रकारे शांत केले ?असल्याचेही बोलले जात आहे.मुळात दुष्काळी सांगोला तालुक्यामध्ये अस्सल गावरान जनावराच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या जे काही तालुके दूध उत्पादनात अग्रेसर आहेत त्यात सांगोला तालुक्याचा समावेश होतो.सदरील दूध केंद्रात आठवड्याला किती लिटर दूध संकलन केले जाते ? व किती लिटर पुढे टँकर द्वारे पाठवले जाते? याची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

जिल्हा दूध संघ बंद झाल्याने किंवा त्यांचे कामकाज विस्कळीत झाल्याने सांगोला तालुक्यात खाजगी दूध संकलन केंद्र वाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे, त्यामध्ये आठवड्या काठी टँकर मागे लाखो रुपयांचे कमाई होत असल्याने या दुधाच्या धंद्यामागे मोठे आर्थिक गणित असल्याचेही बोलले जात आहे,त्यामुळे सांगोला तालुक्यातील काही दूध संकलन केंद्राकडून हा जो पांढरा दुधाचा भेसळीचा काळा धंदा सुरू आहे,यावर अन्नप्रशासनाने तात्काळ कारवाई करून हवेत असणाऱ्या या तथाकथित उद्योजकांना जमिनीवर आणण्याचे काम करून लोकांच्या जीवावर उठणाऱ्या या भेसळीच्या उद्योगास चाप बसवावा अशी रास्त माफक अपेक्षा या निमित्ताने सांगोला तालुक्यातील जाणकार अन्न सुरक्षा विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या कडून व्यक्त करीत आहेत.

चार ते पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात आलेला पैसा, मोठमोठे उद्योग,पतसंस्था,बँका यातील नेमका कुठला उद्योग फायद्यात आहे? हे सर्व तालुक्यातील जनतेला उघडच्या डोळ्यांनी दिसत असताना देखील हे सर्व एवढ्या सुपरफास्ट गतीने सुरू असताना यामागे नेमका कुठला फायद्याचा उद्योग आहे याची चर्चा सांगोला तालुक्यात सुरू आहे.तसेच सदरील दुधाचा धंदा हाच प्रमुख उत्पन्नाचे स्तोत्र असल्याने या मागे दुध भेसळीचे मोठे रॅकेट असल्याचे ही बोलले जात आहे. गेल्या चार-पाच वर्षा पासून हा प्रकार सुरु सुरु असून सहकार आणि उद्योग क्षेत्राच्या अडून अल्पावधीत जो हा उद्योग सुरू आहे या मागे दुधाची भेसळ हाच प्रमुख स्तोत्र असल्याची चर्चा आहे.

# अजनाळेची यशोगाथा इयत्ता सहावीच्या भूगोल अभ्यासक्रमात

## डाळिंबाचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजनाळे गावाचा राज्यभर गौरव

सांगोला : सांगोला तालुक्यातील अजनाळे या छोट्याशा गावाने आपल्या जिद्द, कष्ट आणि लोकसहभागाच्या बळावर दुष्काळावर मात करत विकासाचा आदर्श निर्माण केला असून या प्रेरणादायी कार्याची दखल आता राज्य शैक्षणिक मंडळाने घेतली आहे. अजनाळे गावाची यशोगाथा इयत्ता सहावीच्या भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली असून त्यामुळे गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अजनाळे गावातील सुमारे ९० टक्के नागरिक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. कमी पाऊस, तीव्र सूर्यप्रकाश आणि खडकाळ जमीन अशा प्रतिकूल परिस्थितीतही गावकऱ्यांनी संघर्षाची वाट न निवडता जलसंधारणाचा मार्ग स्वीकारला. सन १९७२ च्या भीषण दुष्काळानंतर गावाचा विविध विकास योजनांमध्ये समावेश झाला आणि गावात बंध, बंधारे, पाझर तलाव तसेच शेततळी उभारून पाण्याचे नियोजन करण्यात आले. गावकऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे अजनाळे परिसरात जलक्रांती घडून आली. ओसाड पडलेल्या जमिनींना नवसंजीवनी मिळाली, शेती उत्पादनात मोठी वाढ झाली आणि गावाची आर्थिक घडी मजबूत झाली.

गेल्या १५ ते २० वर्षांतील उपग्रह छायाचित्रांच्या तुलनेत परिसरात झालेला हरित बदल हा गावाच्या विकासाचा साक्षीदार ठरत आहे. आज अजनाळे हे केवळ सांगोला तालुक्याचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी जलव्यवस्थापन, लोकसहभाग आणि शाश्वत विकासाचा आदर्श बनले आहे.

गावाच्या कार्याला मिळालेल्या या शैक्षणिक सन्मानामुळे राज्यातील लाखो विद्यार्थी अजनाळेच्या विकास मॉडेलची माहिती अभ्यासातून घेणार आहेत. दुष्काळाशी झुंज देत जलसंपन्नतेकडे वाटचाल करणाऱ्या अजनाळे गावाचा हा गौरव प्रत्येक ग्रामस्थासाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा क्षण ठरत आहे.



# मुक्त विचार

## विचारधन



योग म्हणजे शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक शांततेचा संगम, योगासने आणि प्राणायाम शरीराला निरोगी आणि मनाला प्रसन्न ठेवतात.

-श्री श्री रविशंकर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्ष उत्सव हा केवळ भूतकाळातील कार्याचा गौरव नसावा; तो भविष्याच्या दिशेने टाकलेले पाऊलही असावे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना लिहिलेले पत्र देशाच्या सार्वजनिक जीवनात महत्त्वपूर्ण चर्चा निर्माण करणारे ठरले आहे. पत्राचा सूर संघर्षाचा नसून प्रश्नांचा आहे, आरोपांचा नसून स्पष्टीकरणाचा आहे. मात्र त्यातून उपस्थित झालेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. देशातील सर्वात प्रभावशाली आणि व्यापक सामाजिक-सांस्कृतिक संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या संघटनात्मक, आर्थिक आणि कायदेशीर स्वरूपाबाबत अधिक पारदर्शक व्हावे का? हा प्रश्न विचारणे म्हणजे संघविरोधी भूमिका घेणे नव्हे. उलट, एखाद्या संस्थेची ताकद, प्रभाव आणि सामाजिक पोहोच जितकी मोठी असते, तितकी तिच्याकडून उत्तरदायित्वाची अपेक्षाही मोठी असते. लोकशाहीत हीच कसोटी असते. सरकार असो, न्यायसंस्था असो, माध्यमे असोत किंवा सामाजिक संघटना, सार्वजनिक क्षेत्रात प्रभाव टाकणाऱ्या प्रत्येक घटकाला प्रश्नांना सामोरे जावेच लागते.

प्रियांक खर्गे यांच्या पत्रातील आकडेवारी लक्षवेधी आहे. संघाच्या स्वतःच्या वार्षिक अहवालानुसार हजारो शाखा, लाखो स्वयंसेवक, देशभर पसरलेले प्रशिक्षण कार्यक्रम, पथसंचलने, सार्वजनिक मेळावे आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून संघाने एक विशाल नेटवर्क उभे केले आहे. इतकेच नव्हे तर शिक्षण, कामगार, विद्यार्थी, आदिवासी, महिला, ग्रामीण विकास, सेवा प्रकल्प आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या असंख्य संस्थांवर संघाचा वैचारिक प्रभाव असल्याचे सर्वमान्य आहे. यामुळेच संघ हा केवळ एक सांस्कृतिक मंच राहिलेला नाही; तो सार्वजनिक धोरणे, सामाजिक विचार आणि राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकणारी शक्ती बनला आहे. अशा संस्थेची कायदेशीर रचना, निर्णयप्रक्रिया, आर्थिक स्रोत आणि उत्तरदायित्वाची चौकट याविषयी प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक आहे. संघाचे समर्थक अनेकदा सांगतात की संघाची प्रत्येक शाखा उघड्यावर भरते. त्यांचे कार्यक्रम सर्वांसाठी खुले असतात. सेवा प्रकल्पांची माहिती सार्वजनिक असते. संघाच्या कार्यात कोणतेही गुपित नाही. हा युक्तिवाद काही प्रमाणात योग्यही आहे. मात्र, आधुनिक लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकतेचा अर्थ केवळ सार्वजनिक कार्यक्रम नव्हे. संस्थेचे आर्थिक स्रोत कोणते? देणग्या कुठून येतात? खर्चाचे लेखापरीक्षण कसे होते? निर्णय कोण घेतो? जबाबदारी कोणाची असते? अशा प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देणेही तितकेच आवश्यक असते. आज देशातील लाखो स्वयंसेवी संस्था, ट्रस्ट, धार्मिक संघटना, कंपन्या आणि शैक्षणिक संस्थांना आर्थिक अहवाल, कर विवरणे, नोंदणी कागदपत्रे आणि लेखापरीक्षणाची माहिती सादर करावी लागते. अनेक संस्था ही माहिती सार्वजनिकपणे उपलब्ध करून देतात. कारण पारदर्शकता ही केवळ कायदेशीर बंधन नसून विश्वास निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे.

याच ठिकाणी खर्गे यांच्या पत्राचे महत्त्व वाढते. त्यांनी विचारलेले प्रश्न संघाच्या विचारसरणीवर नाहीत. त्यांनी संघाच्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नाही. त्यांनी संघाच्या सामाजिक कार्यालाही नाकारलेले नाही. उलट, संघाच्या व्यापक उपस्थितीची दखल घेत त्यांनी एवढेच विचारले आहे की इतक्या मोठ्या प्रमाणात सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेली संस्था स्वतःला कोणत्या कायदेशीर चौकटीत बसवते? लोकशाहीत हा प्रश्न विचारणे योग्यच म्हणावे लागेल. संविधान, सामाजिक समरसता, जातिव्यवस्था, आरक्षण, अल्पसंख्याक प्रश्न आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या विषयांवर त्यांनी तुलनेने खुलेपणाने मते व्यक्त केली आहेत. त्यामुळेच संघाकडून पारदर्शकतेच्या प्रश्नावरही सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा ठेवली जाऊ शकते. मात्र, या संपूर्ण चर्चेचे राजकारण होण्याचा धोका नाकारता येत नाही. भारतात संघ हे केवळ सामाजिक संघटनाच नाही, तर राजकीय चर्चेचे केंद्रही आहे. त्यामुळे संघावर टीका झाली की समर्थक ती राजकीय हल्ला म्हणून पाहतात, तर विरोधक त्याला मोठा मुद्दा बनवतात. परिणामी मूळ प्रश्न बाजूला पडतो. पण लोकशाहीचे सौंदर्यच हे आहे की प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि उत्तर देण्याची जबाबदारी दोन्ही समान महत्त्वाच्या असतात. कोणतीही संस्था कितीही मोठी असली तरी ती प्रश्नांच्या पलीकडे जाऊ शकत नाही. उलट, मोठेपणासोबत उत्तरदायित्व अधिक वाढते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचा उत्सव हा केवळ भूतकाळातील कार्याचा गौरव नसावा; तो भविष्याच्या दिशेने टाकलेले पाऊलही असावे. संघाने जर या प्रसंगी अधिक पारदर्शक, अधिक उत्तरदायी आणि अधिक खुल्या संवादाची भूमिका स्वीकारली, तर तो भारतीय लोकशाहीच्या प्रगल्भतेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. शेवटी, प्रश्न संघ अस्तित्वात राहावा की नाही, हा नाही. प्रश्न असा आहे की देशातील सर्वात प्रभावशाली सामाजिक संघटनांपैकी एक असलेल्या संघाने स्वतःला सार्वजनिक उत्तरदायित्वाच्या उच्च निकषांवर उभे करावे का? याचे उत्तर होय असेच असायला हवे. कारण पारदर्शकता ही कोणत्याही संस्थेची कमजोरी नसते तर ती तिच्या आत्मविश्वासाची ओळख असते. शंभर वर्षांचा इतिहास हा अभिमानाचा विषय असू शकतो, परंतु पुढील शंभर वर्षांचा विश्वास कमविण्यासाठी पारदर्शकतेची वाट निवडावी लागते. संघाने समाजाला संघटित करण्याचे कार्य केले आहे, आता समाजासमोर स्वतःची उत्तरदायित्वाची चौकटही तितक्याच आत्मविश्वासाने मांडण्याची वेळ आली आहे. शताब्दी वर्षातील खरा उत्सव मिरवणुकांमध्ये नव्हे, तर लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या बांधिलकीच्या नव्या घोषणेत असेल.

**-प्रविण बागडे,नागपूर**

## योग दिवस

योगामुळे बल, बुद्धी आणि धनाची वृद्धी होते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात समृद्धी मिळते. जीवनात आनंद आणण्याचा हा एक आधार आहे. जीवनात बहार आणा – योग हा जीवनाचा आधार आहे.बालपणी सर्वजण विचारतात की मोठे होऊन काय बनणार? उत्तर असते – इंजिनियर, डॉक्टर, पोलीस किंवा वकील इत्यादी. मोठे होतो आणि नोकरी-व्यवसायात लागतो. संसारात पदार्पण होते. दिवस-रात्र मेहनत करून पैसे कमावतो, पुन्हा कमावतो. शरीराकडे दुर्लक्ष होते. शरीराला काही त्रास झाला तर औषध घेऊन आराम करतो आणि पुन्हा तेच –पैसा, पैसा, पैसा. लाखपती, करोडपती बनतो; पण जीवनात खरा सुख-शांती-आनंद मिळत नाही. कमावणे चुकीचे नाही; पण पैसे कमावताना शरीराकडे दुर्लक्ष करणे निश्चितच योग्य नाही. आपण स्वतःला सुशिक्षित समजतो. व्यायाम-प्राणायाम करण्यास सांगितल्यावर एकच उत्तर मिळते – वेळ नाही. पण हॉस्पिटलमध्ये दोन-तीन तास देतो.

तरुणपणी कळत नाही; पण जशी-जशी वय वाढते, तसा आपला शरीर रोगांचे घर बनू लागतो. औषधांनी तात्पुरता फायदा होतो; पण तो कायमस्वरूपी नसतो. शरीर निरोगी ठेवण्यासाठी लहानपणापासून योग-प्राणायाम-व्यायाम करायला हवा. कोणतेही साधन असो, त्याची वेळोवेळी सर्व्हिस करावी लागते. चाळीशीनंतर शरीर क्षीण होऊ लागते. शरीराला व्यायाम व योग-प्राणायामाची सवय असेल तर वाढत्या वयाबरोबर रोग होत नाहीत; झाले तरी सहज निघून जातात, कळतही नाही. निरोगी आणि आनंदी जीवनासाठी आपल्या दैनंदिन जीवनात योगासन-प्राणायामाला महत्त्वाचे कार्य समजून अग्रक्रम द्यावा.

गीता अध्याय ६ श्लोक ५

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्।

आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः।।

विवेकयुक्त मनाने स्वतःचा उद्धार करावा. अज्ञानामुळे अधोगतीकडे जाऊ नये. ज्ञानयुक्त मन जीवात्म्याचा मित्र आहे आणि ज्ञानरहित मन जीवात्म्याचा शत्रू आहे.

योगाची गरज:संस्कारांची जागा संसाराने घेतली आहे. सकारात्मक विचारांच्या जागी नकारात्मक विचार आले आहेत. जास्त वेळ सोफ्यावर बसून टीव्ही पाहणे – स्थूलतेला आमंत्रण. स्कूटर व कारचा जास्त वापर. आरामदायी नोकरी. सर्व कामे बसून करणे आणि संगणकीकरणामुळे शारीरिक व मानसिक कमजोरी. घरात इलेक्ट्रिक साधनांचा वापर आणि बाकी सर्व कामांसाठी कामवाली –त्यामुळे मेहनत शून्य. आजच्या युगाची गरज आहे की संसार करताना संस्कार जीवनात आणावेत. शारीरिक व मानसिक विकासासाठी थोडा वेळ द्यावा. जीवनात ध्येय निश्चित करून त्यासाठी नियमितता आणि सातत्य आवश्यक आहे. योगामुळे शारीरिक-मानसिक विकास होतो, रोग येत नाहीत; आले तरी सहज दूर होतात. योगामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शरीर निरोगी होते आणि मन मजबूत बनून आत्मविश्वास वाढतो, त्यामुळे जीवन आनंदमय व प्रसन्न बनते.

मानवाच्या जीवनात दिनचर्या आहार आणि मनाची स्थिती फार महत्वाचे आहे. दिनचर्या लवकर झोपणे आणि लवकर उठणे , सात्विक आहार आणी कुठल्याही परिस्थित स्थितप्रज्ञ राहणे आनंदी जीवनाची गुरूकील्लि आहे. हिंदू धर्मात सकाळच्या वेळेला खूप महत्त्व दिले गेले आहे. विशेषतः सकाळी उठताच आपण सर्वप्रथम देवाचे स्मरण करतो, तर पूर्ण दिवस चांगला जातो.लवकर झोपणारा आणि लवकर उठणारा तो जगात सर्वात पुढे असतो.लवकर झोपणे आणि लवकर उठणे मनुष्याला निरोगी, धनवान आणि बुद्धिमान बनवते – बेन फ्रँकलिन आपण सर्वजण निरोगी आणि तंदुरुस्त राहू इच्छितो, परंतु फक्त इच्छा करून काय होणार? त्यासाठी प्रामाणिकपणे सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपण दिवसभरात किमान दोन-तीन तास सिरियल पाहणे, बातम्या किंवा सिनेमा पाहणे किंवा इतर कार्यक्रम पाहणे आणि वर्तमानपत्र वाचणे यासाठी वेळ देतो. काही वेळ आपण गप्पा मारण्यात किंवा मोबाईल फोन, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, इंटरनेट यासाठी देतो. हे सर्व करू नये असे नाही, पण यामुळे वेळ जातो, जीवनाचा विकास होत नाही. आनंदी जीवन जगण्यासाठी तन-मनाचे शक्तिशाली असणे खूपच आवश्यक नाही तर अत्यावश्यक आहे. पण आपण त्यासाठी वेळ देतो का? उत्तर आहे - नाही. वेळच नाही. आज माणसाची जीवनशैली इतकी व्यस्त आहे की जीवनात ज्याला प्राधान्य द्यायला हवे त्याला आपण गौण समजतो आणि ज्याला गौण समजायला हवे त्याला प्राधान्य देतो. ते मिळवण्यासाठी दिवस-रात्र धावतो. तब्येत बिघडल्यावर औषध घेऊन समाधान मानतो, जे तात्पुरते असते.

तन-मन कायमस्वरूपी निरोगी आणि तंदुरुस्त बनवण्यासाठी जीवनशैली बदलून ऋषिमुनींनी सांगितलेल्या मार्गदर्शनाला समजून जीवनात आणणे आवश्यक आहे.दिवसाची सुरुवात योग आणि अध्यात्माने व्हावी. किमान तीन तास यम-नियमांचे पालन करून ध्यान, आसन, प्राणायाम, पाठ-पूजा, सेवा यासाठी वेळ देणे आणि फिरणे, सायकल चालवणे, पोहणे यामुळे सकारात्मक ऊर्जा मिळते. त्यामुळे पूर्ण दिवस काम करण्याची क्षमता वाढते. थकवा जाणवत नाही आणि रात्री शांत झोप लागते. म्हण आहे - लवकर निजे, लवकर उठे, तोच जगात सर्वांत पुढे. जो झोपतो तो हरवतो.सकाळी लवकर उठून कोमट पाणी प्यावे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत १० ते १२ ग्लास पाणी प्यावे. जेवणाच्या अर्धा तास आधी पाणी प्यावे. जेवत असताना पाणी पिऊ नये. जेवणानंतर एक तासाने पाणी प्यावे. संध्याकाळनंतर जास्त पाणी पिऊ नये. झोपण्यापूर्वी एक ग्लास कोमट गरम दूध किंवा पाणी प्यावे.

भोजन सात्विक आणि पौष्टिक असावे. रोजच्या जेवणात फळांचा समावेश असावा. शक्यतो घरचेच जेवण करावे. बाहेरचे खाणे टाळावे. अवघड आहे, पण अशक्य नाही. नेपोलियन बोनापार्टनेही म्हटले आहे - Nothing is impossible, eveA°ything is possible. Impossible म्हणजे I am possible. पोट म्हणजे जठराचा अर्धा भाग अन्नासाठी, एक चतुर्थांश भाग हवेसाठी आणि एक चतुर्थांश भाग पाण्यासाठी ठेवावा. कधी कधी जास्त खाल्ले किंवा गोड खाल्ले तर तितकीच जास्त कसरत करा.

एक ठिकाणी छान लिहिले होते:

शतम् विहाय भोक्तव्यं सहस्रं स्नानमाचरेत

लक्षं विहाय दातव्यं कोटिं त्यक्त्वा हरिं भजेत।

शंभर कामे सोडून जेवण करावे, हजार कामे सोडून स्नान करावे, लाख कामे सोडून दान करावे आणि कोट्यवधी कामे सोडून भगवानाचे नाव जपावे.

भोग भोगणारा भोगी बनीं,आज नाही तर उद्या रोगी बनीं.योग ज्याने केला तो निरोगी बनतो.मोठमोठे आजार सहज दूर होतात.शरीर आणि मन निरोगी, आनंदी व प्रसन्न बनवण्यासाठी योगासन-प्राणायाम करण्याचा संकल्प करून आजारांना टाटा-बाय-बाय म्हणूया आणि इतराना प्रेरणा देवूया.

**-नरेंद्र गिरधरलाल वाणी,पुणे**

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३४ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# ज्ञान, संस्कार आणि आरोग्यदायी शिक्षणातून घडवूया उज्ज्वल भविष्य-चेतनसिंह केदार-सावंत



सांगोला : राजुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, शाळेचा गणवेश व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी परिसरात सणासारखे वातावरण निर्माण झाले होते.

रंगीबेरंगी सजावट, शिक्षकांचे आपुलकीने भरलेले स्वागत आणि पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नियमित अभ्यास, पुस्तकांशी मैत्री आणि शिक्षणाच्या माध्यमातून जीवनात यश संपादन करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्नशील राहावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लागवड व संवर्धन ही काळाची गरज असून भावी पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले, शाळा प्रवेशोत्सव हा केवळ एक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांच्या सुंदर प्रवासाची सुरुवात आहे. आज शाळेत प्रवेश घेणारे हे चिमुकले विद्यार्थीच उद्याचा देश घडविणार आहेत.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य सदाशिव दबडे, केंद्रप्रमुख दिनकर गाडे, शाखा विस्तार अधिकारी भंडारी सर, सूर्यकांत खुळे, सरपंच प्रतिभाताई व्हळगळ, उपसरपंच मोहिनीताई काटे, महेश काटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक बडगर, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, पत्रकार, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भक्तीमय वातावरणात सांगोला शहरात अधिक महिना दिंडी सोहळ्याची सांगता



सांगोला : गेल्या महिनाभरापासून सांगोला शहरात सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताह आणि भक्तीमय दिंडी सोहळ्याची सोमवारी अधिक महिना अमावस्येच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात सांगता झाली.

या सांगता समारंभानिमित्त शहरात विविध ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. अधिक महिन्याचे औचित्य साधून सांगोला शहरात गेल्या महिनाभर दररोज पहाटे साडेपाच ते सकाळी साडेसात या वेळेत दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते. काकड आरती, भजने, विठ्ठल-रखुमाईचा गजर आणि टाळ-मृदंगाच्या आवाजाने संपूर्ण शहर भक्तीरसात न्हाऊन निघाले होते.

या दिंडी सोहळ्यामध्ये प्रामुख्याने महादेव गल्ली येथील दत्त मंदिर दिंडी सोहळा, कोष्टी गल्ली येथील विठ्ठल मंदिर दिंडी सोहळा आणि वजिराबाद पेठ येथील विठ्ठल मंदिर दिंडी सोहळा यांनी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. दररोज नित्यनियमाने निघणाऱ्या या दिंड्यांमध्ये अबालवृद्धांसह महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.

सोमवारी अधिक महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला या सर्व दिंड्यांची भक्तीमय वातावरणात सांगता झाली. सांगता समारंभानंतर सर्वच मंदिरांच्या परिसरात आणि गल्ल्यांमध्ये महाप्रसादाचे भव्य वाटप करण्यात आले. महिनाभर चाललेल्या या आध्यात्मिक सोहळ्यामुळे सांगोला शहरात एक वेगळीच ऊर्जा आणि प्रसन्नता पाहायला मिळत होती.

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य पदी विक्रमी मताने निवड सांगोला बार असोसिएशनच्या वतीने अॅड.मिलिंद थोबडे यांचा सत्कार



सांगोला : सांगोला बार असोसिएशनच्या वतीने दिनांक १५/०६/ २०२६ रोजी सोलापूर येथील जेष्ठविधीज्ञ आणि ज्यांची नुकतीच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य पदी विक्रमी मताने निवडून आले बद्दल अॅड. मिलिंद थोबडे यांचा सत्कार सांगोला बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.विशालदिप बाबर यांच्या हस्ते संपन्न झाला.

सांगोला बार असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या या सत्कार अॅड. विजयकुमार धोकटे, अॅड.मारुती ढाळे, अॅड.सचिन कुलकर्णी, अॅड.विशाल बेले, अॅड.मुक्तार इनामदार, अॅड.उदय कुमार घोंगडे, अॅड.बापू माने, अॅड.संजीव शिंदे, अॅड.शहाजी पवार, अॅड.सुनीता धनवडे, अॅड.राजेश्वरी केदार, अॅड.हिरादेवी घोंगडे, आदि विधिज्ञांनी आपले मनोगत व्यक्त करून अॅड.मिलिंद थोबडे यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा मधील सलग तिसऱ्यांदा केलेल्या विजय संपादनाबाबत अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन अॅड.गजानन भाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन अॅड.शिवानंद पाटील यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बार असोसिएशनचे सचिव अॅड.शरद साळुंखे, उपाध्यक्ष अॅड.नवनाथ खट्टे, सहसचिव अॅड.अनुष्का कांबळे, महिलाप्रतिनिधी अॅड.मधुरा डबीर यांनी केले. यावेळी सांगोला विधीज्ञ संघातील सर्व ज्येष्ठविधीज्ञ उपस्थित होते.

सांगोला विधीज्ञ संघाचे जेष्ठ विधीज्ञ अॅड.उदय बापू घोंगडे यांच्यावर नुकतीच गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडून ते प्रथमच कोर्टात उपस्थित झाले म्हणून त्यांचाही सत्कार सर्व बार सदस्यांच्या वतीने संपन्न झाला.

# सांगोला विद्यामंदिरच्या उपमुख्याध्यापकपदी प्रदीप धुकटे उपप्राचार्यपदी शिवशंकर तटाळे तर पर्यवेक्षकपदी सौ.शुभांगी घोंगडे



सांगोला : सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये सेवानिवृत्तीमुळे रिक्त असलेल्या प्रशासकीय पदांवर संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रशासकीय सेवाज्येष्ठतेनुसार उपमुख्याध्यापकपदी प्रदीप धुकटे, उपप्राचार्यपदी प्रा. शिवशंकर तटाळे आणि पर्यवेक्षक पदी सौ.शुभांगी घोंगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके,उपाध्यक्ष अॅड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, संस्था कार्यकारिणी सदस्या शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, सर्व संस्था सदस्य, प्राचार्य चारूदत्त जगताप, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे यांच्यासह सांगोला विद्यामंदिर परिवारातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# श्री.दिपक उर्फ गुंडादादा खटकाळे यांच्याकडून वाढदिवसानिमित्त सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट



सांगोला : सांगोला नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंद भाऊ माने व मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत युवा सेना तालुकाप्रमुख दिपक उर्फ गुंडादादा खटकाळे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे सांगोला नगरपरिषदेस भेट म्हणून दिली.

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने वृक्षांचे शहरातील वासूद चौक ते कडलास नाका रस्त्यावरील दुभाजकामध्ये तसेच न्यू इंग्लिश स्कूल क्रीडा मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने, व सागर पाटील, महूद जि प.गटाचे सदस्य दादासाहेब लवटे, पंचायत समिती उपसभापती अजय सरगर, उद्योगपती बाळासाहेब आसबे, संजयभाऊ केदार इ. मान्यवर व नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष आनंद (भाऊ) माने यांनी शहरातील इतर नागरिक उद्योजक व्यापारी व सामाजिक संस्थांनाही वाढदिवस, वर्धापन दिन यासारख्या विशेष प्रसंगी सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमात सहभागी व्हावे असे जाहीर आवाहन केले तसेच पुढील पाच वर्षात नगरपरिषदेकडून एक लाख वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कोरडा नदी पात्रात अवैध वाळू उपसा; पोलिसांची धाड, ३३ लाखांचा मुद्देमाल जप्त

सांगोला : सांगोला तालुक्यातील सोनंद परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर सांगोला पोलिसांनी कारवाई करत मोठा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत जेसीबी मशीन ताब्यात घेण्यात आले असून वाळू वाहतूक करणारा टेम्पो चालक घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती समोर आली आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १९ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.२० वाजण्याच्या सुमारास सोनंद येथील चव्हाण मळा ते कारडा नदीपात्राकडे जाणाऱ्या मार्गावर अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार घटनास्थळी धाड टाकण्यात आली.

यावेळी जेसीबीच्या सहाय्याने चारचाकी टेम्पोमध्ये शासनाची कोणतीही परवानगी, पास अथवा वैध कागदपत्रांशिवाय नदीपात्रातून वाळू भरली जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सुमारे ३० लाख रुपये किमतीचा विना नंबरचा जेसीबी जप्त केला. मात्र पोलिसांच्या कारवाईची चाहूल लागताच टेम्पो चालक वाहनासह पसार झाला. संबंधित टेम्पो व त्यामधील अंदाजे एक ब्रास वाळूची किंमत मिळून एकूण ३ लाख ७ हजार रुपये इतका मुद्देमाल असल्याचे नोंदविण्यात आले आहे.

या प्रकरणी एक जणासह अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सरकारतर्फे फिर्याद पोलीस कर्मचारी मच्छिंद्र पिराजी माळी यांनी दिली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक नलवडे करीत आहेत.

# दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या प्रयत्नानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

## ग्राहक आणि प्रशासनाच्या समन्वयाने भारनियमनावर निघणार तोडगा; महावितरणचे अधिकारी शेतकऱ्यांच्या भेटीला

सांगोला : सांगोला शहर आणि तालुक्यात सकाळी ६ ते १० आणि रात्री ६ ते १० या वेळेत विजेचे भारनियमन होणार नाही तसेच शेतीपंपासाठी पूर्ण क्षमतेने ८ तास वीजपुरवठा केला जाईल असे आश्वासन वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता साळवे यांनी दिले. माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील आणि सांगोला शहर व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळांसोबत शुक्रवार दि १९ जून रोजी सांगोला येथील महावितरणच्या कार्यालयात बैठक पार पडली.

सांगोला शहर आणि तालुक्यातील वाढत्या भारनियमनामुळे शेतकरी आणि पशुपालक चिंतेत होते. या पार्श्वभूमीवर सोमवार दि १५ जून रोजी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी थेट महावितरणच्या कार्यालयात धडक दिली होती. शेतकरी आणि पशुपालकांसाठी जाचक असणारे भार नियमन त्वरित रद्द करा अन्यथा थेट वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाला टाळे ठोकू असा इशारा दिला होता. यावेळी वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता मधुकर साळवे आणि कार्यकारी अभियंता शिंदे यांनी सांगोला येथे येऊन सदरचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. दिलेल्या आश्वासनानुसार शुक्रवार दि १९ रोजी ते सांगोला येथील महावितरणच्या कार्यालयात आले होते. यावेळी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासह शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ आणि महावितरणचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी वीज वितरण



कंपनी आणि वीज वितरण कंपनीचे ग्राहक यांनी परस्परात समन्वय आणि संवाद ठेवण्याचे आवाहन केले. तसेच शेतकरी आणि पशुपालकांनीही वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य करून त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देण्याची विनंती केली. सकाळी सहा ते दहा आणि रात्री सहा ते दहा या वेळेत जास्त वीज लागणारी उपकरणे चालवू नयेत यामुळे प्रशासनावर अतिरिक्त भार पडतो आणि त्यातून नाईलाजाने प्रशासनाला भारनियमन करावे लागते यासाठी वीज वितरण कंपनीचे ग्राहक असणाऱ्या शेतकरी आणि पशुपालकांनी आपली कर्तव्ये लक्षात ठेवून प्रशासनाला सर्वोतोपरी मदत करावी असे आवाहन शेतकरी आणि पशुपालक बांधवांना केले.

यावेळी ज्येष्ठ नेते तानाजी पाटील, शिवाजी बनकर, विजय येलपले, विजय पवार, चंद्रकांत चौगुले, चंद्रकांत कारंडे, सोमनाथ लोखंडे, सूर्याजी खटकाळे, ज्ञानेश्वर शिंदे यांच्यासह पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

# मोफत जयपूर फूट कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अनेक दिव्यांग बांधवांना मिळाला आधार



सांगोला : सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या रोटरी क्लब सांगोला आणि रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला मोफत जयपूर फूट कॅम्प उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाला. सांगोला अर्बन बँकेच्या महात्मा फुले सभागृहात पार पडलेल्या या शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला असून अनेक गरजू दिव्यांग रुग्णांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. सकाळी सुरू झालेल्या या शिबिरात विविध भागांतून आलेल्या दिव्यांग बांधवांची तपासणी करून त्यांच्या गरजेनुसार कुबड्या, कृत्रिम हात तसेच कृत्रिम पाय यांचे विनामूल्य मोजमाप घेण्यात आले. अनेक लाभार्थींना त्यांच्या दैनंदिन जीवनात स्वावलंबन मिळविण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब सांगोला या संस्थेने घेतली. या उपक्रमामुळे लाभार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

जयपूर फूट कॅम्पच्या माध्यमातून शारीरिक अडचणींवर मात करून दिव्यांग व्यक्तींना पुन्हा आत्मविश्वासाने उभे राहण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवत रोटरी क्लबने सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण घालून दिले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प प्रमुख रो. इंजि. अशोक गोडसे, सचिव रो. विजय म्हेत्रे, अध्यक्ष रो. श्रीपती आदलिंगे तसेच रोटरी क्लब ऑफ सांगोल्याचे डॉक्टर प्रभाकर माळी, सी ए के एस माळी, इंजि. विकास देशपांडे इंजि. हमीद शेख, महेश गवळी, सुधीर सुरवसे, सुरेश माळी, धनाजी शिर्के, इंजि. विलास बिले, प्राध्यापक राजेंद्र ठोंबरे, अरविंद डोंबे गुरुजी, डॉक्टर मच्छिंद्र सोनलकर, निळकंठ लिंगे सर, दीपक चोथे, गोविंद माळी, माणिक भोसले, तसेच डॉक्टर अनिल कांबळे या सर्व आजी-माजी पदाधिकारी व सर्व रोटरी सदस्यांच्या सहकार्यातून आणि नियोजनबद्ध पद्धतीने परिश्रम घेतले. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा सेवाभावी उपक्रमांची भविष्यातही सातत्याने गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील रस्त्यांसाठी ७ कोटी निधी मंजूर





सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांच्या विकासासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी तालुक्यातील विविध गावांमधील मुख्य रस्ते, उपरस्ते आणि खेड्यांतील जोड रस्त्यांच्या सुधारणेसाठी वापरला जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री. जयकुमार गोरे यांच्याकडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सदरचा निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांनी तत्काळ निधी मंजूर रस्ता, ढोलेमळा रस्ता ते संगेवाडी, इजिमा ५५ ते मेडशिंगी रस्ता, सोनंद मासाळवस्ती ते आगलावेवाडी रस्ता, गौडवाडी जुजारपूर गुणाप्पाचीवाडी ते वाळेखिंडी ते जि. हद्द रस्ता, हतीद ते ह. मंगेवाडी रस्ता, पाचेगांव बु. ते किडबिसरी रस्ता, कोळे ते बाणुरगड रस्ता, महुद ते (हलदहीवडी) इजिमा ९१ रस्ता, रामा १२४ ते (शिवणे म्हसोबा देवस्थान) प्र.१८२ रस्ता, शिवणे घाडगेवस्ती ते हलदहिवडी रस्ता, वाकी घेरडी निमग्रेवाडी केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

सदरच्या मंजूर रस्त्यांमध्ये सांगोला तालुक्यातील (शिरभावी) मांजरी सावे इमडेवाडी रस्ता, (भोपसेवाडी) मानेवाडी रस्ता, (घेरडी) मानेवस्ती ते ग्रामा १९० ते कडलास रस्ता या कामांना प्रत्येकी ५० लाख असे एकूण ७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीमुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना उत्पादन वाहतुकीसाठी मोठा फायदा होणार आहे. सध्या अनेक गावांमध्ये रस्त्यांची अवस्था खराब असल्याने शेतमाल बाजारात नेणे कठीण होत होते.या विकासकामांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# प्रमाणित बियाणे अनुदानावर उपलब्ध; शेतकऱ्यांनी खरेदी विक्री संघ, सांगोला येथे लाभ घ्यावा - कृषी विभाग

सांगोला : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत प्रमाणित बियाणे अनुदानावर उपलब्ध करून देण्यात आले असून कृषी विभागाकडे संबंधित पिकांसाठी ऑनलाईन अर्ज केलेले तसेच अद्याप अर्ज न केलेले सर्व शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान योजनेंतर्गत सांगोला तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ, सांगोला येथे बियाणे उपलब्ध झाले असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

उपलब्ध बियाण्यामध्ये तूर, मूग, उडीद व मका या पिकांचा समावेश असून शासनाच्या अनुदानामुळे शेतकऱ्यांना कमी दरात बियाणे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुक शेतकरी बांधवांनी वेळ न दवडता आवश्यक कागदपत्रांसह खरेदी विक्री संघ, सांगोला येथे भेट देऊन अनुदानावर बियाणे खरेदी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे यापूर्वी ऑनलाईन अर्ज केले आहेत त्यांनी देखील संबंधित प्रक्रियेसाठी संपर्क साधावा व उपलब्ध साठ्यानुसार लाभ घ्यावा, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

आवश्यक कागदपत्रे :१) चालू तीन महिन्यातील ७/१२ उतारा,२) ॲग्रिस्टॅक नंबर,३) आधार कार्ड ४) मोबाईल नंबर शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून उपलब्ध अनुदानित बियाणे योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग, सांगोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.